पिंपळनेर पोलीस स्टेशन, जिल्हा धुळे
दुरध्वणी क्रमांक ०२५६१-२२३०३३
Email I.D :- pimpalner.ps@gmail.com

महाराष्ट्र पोलीस

## प्रेस नोट

दिनांक .१२/१२/२०२४

दिनांक.१२/१२/२०२४ रोजी मा.श्रीराम पवार,स्थानिक गुन्हे शाखा धुळे यांना पिंपळनेर पोलीस स्टेशन हददीत सामोडा चौफुली जवळ एका टपरीच्या जवळ काही इसम पत्याचा हारजितचा जुगार खेळत असल्याची बातमी मिळाले होती. त्यानुसार पोहेकॉ/सदेसींग चव्हाण स्था.गुन्हे शाखा यांना पिंपळनेर येथे पाठवुन प्रभारी अधिकारी यांना माहीती देवुन कारवाई करणेसाठी सुचना केली होती.

दुपारी १३.०० वा सुमारास आंम्ही वरिष्ठ कडील मिळालेल्या सुचना नुसार संयुक्त कारवाईत पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांना बातमीची खात्री करुन तात्काळ कारवाई करणेसाठी सुचना व मार्गदर्शन केले ,सदर कारवाईत पिंपळनेर सामोडा चौफुली लगत बंद पडलेल्या टप-यांचे आडोशाचा फायदा घेवुन पोलीसांचे नजरेआड राहुन काही इसम जुगार खेळत असल्याचे दिसुन आले खात्रीशिर संशय आल्याने पथकातील अंमलदार यांनी १३.३० वा सुमारास छापाची कारवाई केली आहे.सदर कारवाईत खालील प्रमाणे पत्ता जुगार हारजितचा खेळ खेळत असणारे -------

१.मनोज रामा मोहीते रा रामनगर पिंपळनेर यांचे कब्जात २३००/- रुपये रोख रुपये
२.पांडुरंग पराराम पगारे रा गोपाळनगर पिंपळनेर यांचे कब्जात २७४०/-रुपये रोख रुपये
३.मनोज अंबादास गवळी रा कुस्ती मैदानजवळ पिंपळनेर याचे कब्जात ३३७०/-रुपये रोख रुपये
४.शफी सलीम शेख रा इंदिरानगर पिंपळनेर याचे कब्जात २२५०/-रुपये रोख रुपये
५.एक पत्याचा कॅट व जमिनीवर मिळालेले रोख रक्कम १४९०/- असे आरोपी व जुगार खेळ खेळण्यासाठी लागणारे पत्याची कॅट व रोख रक्कम असे **एकुण १२.१५०/- रुपये** किंमतीचा मुददेमाल मिळुन आल्याने कारवाई कामी आरोपी इसम व मुददेमाल ताब्यात घेतले आहेत.

वरील प्रमाणे कारवाईत पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे पोकॉ/ हरीष बाजीराव पाटील यांनी कायदेशीर फिर्याद दिले वरुन गुन्हा नोंद झालेला आहे पुढील तपास असई राजेंद्र मोरे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक मा.श्री श्रीकांत धिवरे सो, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.किशोर काळे सो, उप विभागीय पोलीस अधिकारी ग्रामिण विभाग साक्री मा. श्री.संजय बांबळे सो ,श्री श्रीराम पवार पोलीस निरीक्षक स्थानिग गुन्हे शाखा धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री किरण बर्गे, पोहेकॉ/ सदेसिंग चव्हाण ,स्थानिग गुन्हे शाखा धुळे, पिंपळनेर पोलीस स्टेशन येथील पथक असई/राजेंद्र मोरे, पोकॉ/ हरीष पाटील, पोकॉ/प्रविण धनगर, अशांचा सहभाग आहे पुढील कार्यवाही सुरु आहे.

Scanned with OKEN Scanner

पिंपळनेर पोलीस स्टेशन, जिल्हा धुळे
दुरध्वणी क्रमांक ०२५६१-२२३०३३
Email I.D :- pimpalner.ps@gmail.com

प्रेस नोट दिनांक ०६/१२/२०२४

दिनांक.०४/१२/२०२४ रोजी गोरक्षक शुभम सुर्यवंशी व सहकारी यांनी डायल ११२ क्रंमाकावर माहीती दिली होती की, बोलेरो पिकअप वाहन क्रं एमएच ४१ ऐ यु ०४५२ यात जनावरांची बेकायदेशीर अवैध वाहतुक करुन कत्तलीसाठी घेवुन जात आहेत कॉल झाल्याने आंम्ही लागलीच पोलीस ठाणेत हजर असलेले ग्रेपोसई/ ईश्वर शिरसाठ यांना सदर वाहनाची खात्री करवुन कारवाई करणेसाठी सुचना केली होती.

त्यावरुन सदर वाहनात ०६ गाईचे वासरु असल्याने सदर वाहन पोलीस ठाणेत आणले होते सदर वाहनातील गोवंश बाबत अधिक खात्री करता सदर जनावरे हे श्री समाधान रामचंद्र धनगर रा मालपुर ता शिंदखेडा यांचे कडेस शेतात पालन पोषणासाठी ताराहाबाद येथुन श्री हरेश अर्जुन मुंदवा धंदा -दुग्धव्यावसाय हल्ली रा ताराहाबाद यांचेकडुन घेतले आहेत व तसा दाखला देखील ताराहाबाद ग्रामपंचायत यांनी दिलेला आहे.

सदर कारवाईत मुळ मालक श्री हरेश अर्जुन मुंदवा (भरवाड) धंदा दुग्धव्यावसाय रा.मु.पो.आकरु ता.धंदुका जि.अहमदाबाद(गुजरात राज्य) ह.मु.ताहराबाद ता.बागलान तसेच श्री समाधान रामचंद्र धनगर रा मालपुर ता शिंदखेडा यांचेकडेस विचारपुस करुन तसे त्यांचे जबाब नोंदवुन खात्री केली आहे. त्यानंतर पोकॉ/कैलास कोळी यांना सदर ठिकाणी गोवंश सोडावे व खात्री करावी की सदर गोवंश हे कत्तलखानी येथे जात नाहीत ना असे सांगुन रवाना केले होते. पोकॉ कैलास कोळी यांनी सदर ठिकाणी खात्री करुन व्हिडीओ रेकॉर्डीग करुन फोटो घेतलेले आहेत. आंम्ही सदर वाहनात ०६ गायीचे वासरु गोवंश वाहतुक होत असल्याने मोटार वाहन कायदा नुसार कायदेशीर कारवाई केली आहे.

तसेच सदर कारवाईत सोशल मिडीया व मोबाईल मेसेज दवारे पोलीसांनी कोणतीची कारवाई न करता सदर वाहन व सोडुन देण्यात आलेले आहे. असे खोटे मेसेज प्रसारीत केलेले आहेत परंतु पोलीसांनी सदर प्रकरणी पुर्ण खात्री करुन कायदेश ीर कारवाई केलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

पिंपळनेर पोलीस स्टेशन, जिल्हा धुळे
दुरध्वणी क्रमांक ०२५६१-२२३०३३
Email I.D :- pimpalner.ps@gmail.com

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

---

प्रेस नोट दिनांक ०३/११/२०२४

---

क्रंमाक - निरंक/प्रेस नेट /दारुबंदी करवाई /पिंपळनेर पोलीस स्टेशन, ता.साक्री/
दिनांक ०३/११/२०२४

## ओमनी निळय रंगाची गाडी वाहनातुन गुजरात राज्यात अवैधरित्या विदेशी दारु वाहतुक करण्यात पिंपळनेर पोलीसांची धडक कारवाई

---

पिंपळनेर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी ,श्री किरण बर्गे हे पोलीस स्टेशन हददीतील गुजरात बॉर्डर वरील ओटाबारी चेकपोस्ट येथे भेट दिली होती त्यादरम्यान गोपनीय बातमी मिळाली की,बसरावळ गावाच्या दिशेने एक निळया रंगाची ओमनी गाडी येतांनी दिसली वाहन चेक करणेसाठी थांबवुन वाहन तपासणी करता सदर वाहन क्रंमाक एम एच ४३ आर ६७१ हिचेत विदेशी दारुचे बॉटल व बॉक्स, त्यात मॅकडॉल नंबर वन ,गोवा टु ईन वन कंपनीची विदेशी दारु ,कॅस्टल व्होडका दारु मिळुन आली आहे.

वरील कार्यवाहीत ५९.३७०/-रुपेय किंमतीचे विदेशी दारुचे बॉटल व बॉक्स, त्यात मॅकडॉल नंबर वन ,गोवा टु ईन वन कंपनीची विदेशी दारु ,कॅस्टल व्होडका दारु,कांगारो प्रिमियम कंपनीची बियर, तसेच २०००००/- रु किं निळया रंगाची ओमनी गाडी क्रंमाक एम एच ४३ आर ६७१ असा मुददेमाल एकुण -२,५९,३७०/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करणेत आला आहे. सदर कार्यवाही बाबत पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपी राहुल सुभाष पवार रा इंदिरानगर पिंपळनेर ता साक्री यास गुन्हयाचे कामी ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई मा विशेष पोलीस महानिरीक्षक सो नाशिक परिक्षेत्र यांनी आगामी विधानसभा निवडुक २०२४ अनुषंगाने दिलेल्या सुचना प्रमाणे तसेच मा पोलीस अधीक्षक मा.श्री श्रीकांत धिवरे सो, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.किशोर काळे सो, उप विभागीय पोलीस अधिकारी ग्रामिण विभाग साक्री मा. श्री संजय बांबळे सो यांचे मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री किरण बर्गे ,भुषण शेवाळे पोलीस उप निरिक्षक, तसेच पोकॉ/ नरेंद्र माळी,पोकॉ/चेतन गोसावी,पोकॉ/सोमनाथ पाटील,पोकॉ/ पंकज वाघ , पोना/दत्तु कोळी,पोकॉ/ दिपक पवार अशांचा सहभाग आहे पुढील कार्यवाही सुरु आहे.

Scanned with OKEN Scanner

सत्यमेव जयते
पिंपळनेर पोलीस स्टेशन
ता.साक्री जि.धुळे
दुरध्वणी क्रमांक ०२५६१-२२३०३३ Email I.D :- pimpalner.ps@gmail.com

क्रमांक - निरंक / प्रेस नोट / दारुबंदी कारवाई पिंपळनेर पो.स्टे, दिनांक ३०/१०/२०२४

## प्रेसनोट

**आयशर वाहनात तांदुळाच्या भुसा भरलेले गोण्यांचे खाली गुजरात राज्यात अवैधरित्या विदेशी दारु वाहतुक करणाऱ्यांचा डाव हाणुन पाडत पिंपळनेर पोलीसांनी केली धडक कारवाई**

पिंपळनेर पोलीस स्टेशनचे **सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे हे पिंपळनेर पोलीस ठाणे येथे हजर असतांना** गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, एका छोटा आयशर गाडी क्रमांक MH १५ FV ९७३० या वाहनात गुजरात राज्यात विदेशी दारु वाहतुक होणार आहे. अशी माहिती मिळालेवरुन **सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे यांनी** कारवाई करणे कामी पथक तयार करुन गुजरात-महाराष्ट्र रस्त्यावरील मांजरी ते नकट्या हनुमंत चेक पोस्ट दरम्यान सदर वाहनाचा पाठलाग करुन नकट्या हनुमंत चेक पोस्टे जवळ सदरचे वाहन थांबविले असता त्यातले आरोपी पळुन गेले परंतु, सदर वाहन तपासले असता वाहनात तांदुळाच्या भुसा भरलेल्या गोण्यांचे खाली रॉयल ब्ल्यु व्हिस्की नावाच्या विदेशी दारुचे १०८ बॉक्स मिळुन आले.

वरील कार्यवाहीत १०,३६,८००/- रुपये किंमतीची रॉयल ब्ल्यु व्हिस्की नावाची विदेशी दारु तसेच आयशर गाडी क्रमांक MH १५ FV ९७३० हिची ६,००,०००/- रुपये किंमतीचे वाहन असे एकुण १६,३६,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन, सदर कार्यवाही बाबत पिंपळनेर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्याचे कामकाज सुरु आहे.

सदर कारवाई मा.विशेष पोलीस महानिरीक्षक.सो,नाशिक परिक्षेत्र नाशिक यांनी आगामी विधानसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने दिलेल्या सुचनाप्रमाणे तसेच मा.पोलीस अधीक्षक सो,धुळे, मा.अपर पोलीस अधीक्षक सो,धुळे, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो,धुळे ग्रामीण विभाग साक्री,मा.पोलीस निरीक्षक सो,स्थानिक गुन्हे अन्वेषन शाखा,धुळे यांचे मार्गदर्शना खाली. पिंपळनेर पोलीस ठाणचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण बर्गे, पोउपनि/विजय चौरे, पोसई/भुषण शेवाळे, पोहेकॉ/कांतीलला अहिरे, पोकॉ/संदीप पावरा, नरेंद्र माळी, विजयकुमार पाटील, सोमनाथ पाटील, रविंद्र सुर्यवंशी, पंकज वाघ, प्रविण धनगर, योगेंद्रसिंग महाले अशांनी केलेली आहे.

**मा.सविनय सादर**

**(किरण बर्गे)**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक**
**पिंपळनेर पोलीस स्टेशन**

-----------**-------------

**प्रति,**

Scanned with OKEN Scanner

पिंपळनेर पोलीस स्टेशन, जिल्हा धुळे
दुरध्वणी क्रमांक 02561-223033
Email I.D :-
pimpalner.ps@gmail.com

क्रमांक - निरंक/ प्रेस नोट/ दारुबंदी कारवाई पिंपळनेर पो.स्टे, दिनांक १५/०४/२०२४

# प्रेसनोट

## अवैधरित्या दारु विक्री करणाऱ्यांविरुध्द पिंपळनेर पोलीसांची कारवाई

आगामी लोकसभा निवडणुक -२०२४ अनुषंगाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक. सो, नाशिक परिक्षेत्र नाशिक यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे व मा.पोलीस अधीक्षक सो,धुळे, यांनी घेतलेल्या आढावा बैठकीचे अनुषंगाने तसेच मा.अपर पोलीस अधीक्षक सो,धुळे, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो,धुळे ग्रामीण विभाग साक्री, यांचे मार्गदर्शना खाली.

पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस यांनी आगामी लोकसभा निवडणुक -२०२४ अनुषंगाने आदर्श आचार संहिता लागु झाले पासुन ते आजपावेतो अवैधरित्या गावठी दारु बनविणारे व विक्री करणारे तसेच विना परमिट देशी - विदेशी दारु विकणारे यांचे विरुध्द वेळो- वेळी गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढुन पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत विविध ठिकाणी तसेच गुजरात राज्य सिमे लगत असणाऱ्या गावांमध्ये हातोडे चालवुन आतापर्यंत आरोपीतां-विरुध्द दारुबंदी कायद्यान्वये १६ गुन्हे दाखल करुन आतापर्यंत गावठी हातभट्टीची दारु व कच्चे रसायन ५४६८ लिटर व देशी / विदेशी ५२.४२ दारु लिटर असा एकुण ३,६०३६५ /- रुपये किंमतीचा मुद्देमाल जागीच नष्ट / हस्तगत करुन कारवाई केली आहे.

सदर कारवाईत पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कापडणीस, पोलीस उपनिरीक्षक विजय चौरे , पोलीस उपनिरीक्षक भुषण शेवाळे यांचे सह पिंपळनेर पोलीस ठाणे येथील स्टाफ अशांनी केली असुन पिंपळनेर पोलीस ठाण्याचे वतीने जाहीर आव्हान करण्यात येते की, आपल्या गावातील कोणी अवैध गावठी हातभट्टीची दारु तयार किंवा विक्री करत असेल त्याबाबची माहिती पिंपळनेर पोलीस ठाण्यास कळवावी.

मा.सविनय सादर

(सचिन कापडणीस)
सहाय्यक पोलीस निरीक्षक
पिंपळनेर पोलीस स्टेशन

-----------**-------------

प्रति,

मा.संपादक

----------धुळे जिल्हा

Scanned with OKEN Scanner

पिंपळनेर पोलीस स्टेशन, जिल्हा धुळे
दुरध्वणी क्रमांक ०२५६१-२२३०३३
Email I.D :- pimpalner.ps@gmail.com

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**प्रेस नोट** **दिनांक .१२/१२/२०२४**

दिनांक.१२/१२/२०२४ रोजी दुपारी १३.०० वा सुमारास आंम्ही वरिष्ठ कडील मिळालेल्या सुचना नुसार संयुक्त कारवाईत स्थानिग गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन कडील स्टाफ यांना बातमीची खात्री करुन तात्काळ कारवाई करणेसाठी सुचना व मार्गदर्शन केले ,सदर कारवाईत पिंपळनेर सामोडा चौफुली लगत बंद पडलेल्या टप-यांचे आडोशाचा फायदा घेवुन पोलीसांचे नजरेआड राहुन काही इसम जुगार खेळत असल्याचे खात्रीशिर संशय आल्याने पथकातील अंमलदार यांनी १३.३० वा सुमारास छापाची कारवाई केली आहे.सदर कारवाईत खालील प्रमाणे पत्ता जुगार हारजितचा खेळ खेळत असणारे ०४ आरोपीत इसम व तसेच जुगार खेळ खेळण्यासाठी लागणारे पत्याची कॅट असे **एकुण १२.१५०/- रुपये** किंमतीचा मुददेमाल मिळुन आल्याने कारवाई कामी आरोपी इसम व मुददेमाल ताब्यात घेतले आहेत.

वरील प्रमाणे कारवाईत पिंपळनेर पोलीस स्टेशन येथे पोकॉ/ हरीष बाजीराव पाटील यांनी कायदेशीर फिर्याद दिले वरुन गुन्हा नोंद झालेला आहे पुढील तपास असई राजेंद्र मोरे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक मा.श्री श्रीकांत धिवरे सो, अपर पोलीस अधीक्षक मा.श्री.किशोर काळे सो, उप विभागीय पोलीस अधिकारी ग्रामिण विभाग साक्री मा. श्री.संजय बांबळे सो ,श्री श्रीराम पवार पोलीस निरीक्षक स्थानिग गुन्हे शाखा धुळे यांचे मार्गदर्शनाखाली पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी श्री किरण बर्गे, पोहेकॉ/ सदेसिंग चव्हाण ,स्थानिग गुन्हे शाखा धुळे, पिंपळनेर पोलीस स्टेशन येथील पथक असई/राजेंद्र मोरे, पोकॉ/ हरीष पाटील, पोकॉ/प्रविण धनगर, अशांचा सहभाग आहे पुढील कार्यवाही सुरु आहे.

Scanned with OKEN Scanner